**ठळक बातम्या**

- होमगार्ड, कोतवाल, ग्राम रोजगार सेवकांना मानधन वाढ, विशेष शिक्षकांच्या पावणे ५ हजारांहून अधिक पदांची निर्मिती करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

- सोनार आणि आर्य वैश्य समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करायला राज्य सरकारची मान्यता, देशी गायींना 'राज्यमाता-गोमाता' जाहीर करण्याचा शासन निर्णय जारी

- विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसकडून राज्यभरातल्या इच्छुकांच्या मुलाखती उद्यापासून

- ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**आणि**

- देशातल्या शेअर बाजार बाजारात मोठी घसरण, सेन्सेक्स पावणे तेराशे अंकांनी कोसळला

**<><><><><><>**

राज्यातले होमगार्ड, कोतवाल, ग्राम रोजगार सेवकांना मानधन वाढ, विशेष शिक्षकांच्या पावणे ५ हजारांहून अधिक पदांची निर्मिती आणि निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या रकमेत वाढ करण्याचे निर्णय राज्य

सरकारनं आज घेतले. होमगार्डला मिळणारा कर्तव्य भत्ता ५७० रुपयांवरुन १ हजार ८३ रुपये होईल. कोतवालांना मानधनात १० टक्के वाढ आणि अनुकंपा धोरण राज्य सरकार लागू करणार आहे. ग्राम रोजगार सेवकांना आता ७ हजार रुपये मानधन आणि प्रोत्साहन अनुदान दिलं जाणार आहे. याशिवाय विशेष शिक्षकांच्या ४ हजार ८६० पदांची निर्मिती करायला मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली. राज्य सरकारच्या सेवेतल्या कर्मचाऱ्यांसाठीचं सेवानिवृत्ती उपदान, मृत्यू उपदानाची मर्यादा वाढवून २० लाख होणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मंत्रीमंडळ बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. मराठा आरक्षणासंदर्भात नेमलेल्या माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा दुसरा आणि तिसरा अहवाल राज्य सरकारनं आज स्वीकारला. सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ आणि आर्य वैश्य समाजासाठी श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ स्थापन करायला मंत्रीमंडळानं मंजुरी दिली आहे.

**बार्टीच्या धरतीवर वनार्टी** स्वायत्त संस्था होणार आहे. धारावीतल्या अपात्र झोपडीधारकांसाठी परवडणारी भाडेतत्त्वावरची घरं उभारण्याची जबाबदारी धारावी पुनर्वसन प्रकल्पाला देण्यात आली आहे. रमाबाई आंबेडकर नगर, कामराज नगरच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला सरकार गती देणार आहे. याशिवाय केंद्र सरकारच्या मिठागराच्या जमिनी राज्य शासनाला मिळणार असून यामुळं दुर्बलांसाठी घरांच्या योजनांना वेग येणार आहे. ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या १२ हजार २०० कोटींच्या सुधारित आराखड्याला राज्य सरकारनं मान्यता दिली. मुंबईत ऑरेंज गेट ते मरीन

ड्राईव्ह भुयारी मार्ग आणि ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गासाठी निधी उभारण्याचा पर्यायांनाही मंत्रीमंडळानं मंजुरी दिली.

**पालघर** जिल्ह्यातल्या मुरबे इथे बहुउद्देशीय बंदर प्रकल्प उभारायला राज्य सरकारची मान्यता मिळाली. राष्ट्रीय दर्जाचं क्रीडा संकुल उभारण्यासाठी आकुर्डी, मालाड आणि वाढवणमधली जागा भारतीय क्रीडा प्राधिकरणाला दिली जाणार आहे. देशी गाईंच्या पालन पोषणासाठी अनुदान योजना, राज्य जलसंपत्ती माहिती केंद्राची स्थापना, अनुसूचित जाती, नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी कृषी स्वावलंबन योजनेचे आर्थिक निकष वाढवायलाही मंत्रीमंडळानं आजच्या बैठकीत मान्यता दिली. कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पाच हजार रुपये प्रति हेक्टर असे दोन हेक्टरच्या मर्यादेत **प्रत्येकी ५ हजार रुपये** अनुदान देण्याचा निर्णय राज्य सरकारने यापूर्वीच घेतला होता. २०२३च्या खरीप हंगामासाठीच्या अनुदान वितरणाची सुरुवात आज झाली. पहिल्या टप्प्यात ४९ लाख ५० हजार खातेदारांच्या खात्यांमध्ये २ हजार ३९८ कोटी ९३ लाख रुपये जमा करण्यात येत आहेत.

दरम्यान, देशी गायींना ‘राज्यमाता- गोमाता’ जाहीर करण्याचा शासन निर्णय राज्य सरकारनं आज जारी केला. गोशालेतल्या देशी वंशांच्या गायींसाठी प्रति गाय प्रति दिन ५० रुपये अनुदान द्यायचा निर्णय आजच्या बैठकीत झाला. सध्या राज्यात ८२८ नोंदणीकृत गोशाळा असून त्यात दीड लाखांहून अधिक गायी आहेत.

**<><><><><><>**

समग्र आरोग्यसेवा मानकामुळे जागतिक चिकित्सा पर्यटनाच्या नकाशावर भारताला विशेष स्थान मिळालं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय आयुष्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज केलं. मुंबईत आयुष वैद्यकीय पर्यटन परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. जगभरातून लाखो लोग आयुर्वेदिक उपचार घेण्यासाठी भारतात येतात. शरीरस्वास्थासोबतच मानसिक आणि अध्यात्मिक स्वास्थ्यालाही महत्व देणारी पारंपरिक भारतीय चिकित्सा आणि आयुष पद्धती यांच्या संयोगातून समग्र आरोग्यसेवा मानक तयार झाल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><><>**

क्रूझ भारत अभियानाद्वारे येत्या पाच वर्षांत क्रूझवरून पर्यटन करणाऱ्यांची संख्या दुप्पट करण्याचं ध्येय असल्याची माहिती केंद्रीय नौकानयन मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी दिली आहे. मुंबई इथं या अभियानाची सुरुवात त्यांच्या हस्ते झाली, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसकडे उमेदवारी मागितलेल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती उद्यापासून घेतल्या जाणार आहेत. प्रदेश काँग्रेसनं इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागवले होते. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला असून १ हजार ६८८ इच्छुकांनी उमेदवारी मागितली आहे. त्याच्या मुलाखतींसाठी काँग्रेसनं माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेसचे प्रदेश

कार्याध्यक्ष नसीम खान, खासदार चंद्रकांत हंडोरे, प्रणिती शिंदे यांच्यासह ज्येष्ठ नेत्यांवर विविध जिल्ह्यांची जबाबदारी सोपवली आहे.

हे नेते दिनांक १ ते ८ ऑक्टोबरपर्यंत आपल्याला नेमून दिलेल्या जिल्ह्यात जाऊन इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतील, आणि १० ॲाक्टोबरपर्यंत आपला गोपनीय अहवाल प्रदेश काँग्रेसला सादर करतील. प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष नाना गावंडे यांनी ही माहिती दिली.

<><><><><><>

ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके हा चित्रपटसृष्टीतल्या योगदानाबद्दलचा सर्वोच्च पुरस्कार जाहीर झाला आहे. पुढच्या महिन्यात होणाऱ्या ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज ही घोषणा केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मिथुन चक्रवर्ती यांचं पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. मिथुन हे सांस्कृतिक आदर्श आहेत, असे गौरवोद्गारही प्रधानमंत्र्यांनी काढले.

दरम्यान, मिथुन चक्रवर्ती यांनी पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त केला असून हा पुरस्कार आपले कुटुंबीय आणि चाहत्यांना अर्पण केला आहे.

<><><><><><>

गेल्या कित्येक दिवसांपासून उच्चांकी पातळी गाठत असलेल्या देशातल्या शेअर बाजारात आज जोरदार घसरण दिसून आली. व्यवहार सुरू झाले तेव्हापासून सुरू झालेली ही घसरण सातत्याने वाढत गेली. सेन्सेक्स

दिवसअखेर १ हजार २७२ अंकांनी घसरुन ८४ हजार ३०० अंकांवर आणि निफ्टी ३६८ अंकांनी घसरुन २५ हजार ८११ अंकांवर बंद झाला.

आशियाई बाजारातल्या घसरणीचा परिणाम देशातल्या शेअर बाजारांवर दिसून येतोय. विदेशी संस्थांत्मक गुंतवणूकदारांकडून होत असलेल्या विक्रीचा फटकाही बाजाराला बसला.

**<><><><><><>**

स्वच्छता ही सेवा या मोहिमेअंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात विविध उपक्रम राबवले जात आहेत. आज पालिका क्षेत्रातल्या शाळांमध्ये एक पेड मां के नाम हा उपक्रम राबवला गेला. महानगरपालिका तसंच खासगी शाळांच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. तसंच, स्वच्छता विषयक प्रचार-प्रसारासाठी स्वच्छता दौडचं आयोजन केलं गेलं. या उपक्रमामध्ये ८४ हजार ७०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे म्हणाले….

**होल्ड - नवी मुंबई**

**<><><><><><>**

महाराष्ट्रातल्या, भगवान गौतम बुद्धांशी संबंधित यांच्या सर्व स्थळांचा त्यांचा विकास करणार असल्याचं केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी आज सांगितलं. त्यांनी आज मुंबईत दादर इथल्या चैत्यभूमीला भेट देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केलं. त्यावेळी ते बोलत होते. पंचशीलाचं प्रतिक असलेल्या बोधचिन्हाचं अनावरणही रिजिजू यांच्या हस्ते झालं.

काँग्रेसनं अल्पसंख्य समाजाबाबत चुकीची समजूत निर्माण करुन लोकांची दिशाभूल केली, अशी टीका रिजिजू यांनी भाजपाच्या अनुसूचित जाती आघाडीनं आयोजित केलेल्या विजय संकल्प मेळाव्यात केली.

<><><><><>

कानपूर इथं सुरु असलेल्या बांगलादेशाविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात आज चौथ्या दिवशी भारतानं २६ धावांची आघाडी घेतली. बांगलादेशाचा पहिला डाव आज २३३ धावांवर आटोपला. भारतानं पहिल्या डावात ९ बाद २८५ धावा झाल्या असताना डाव घोषित केला. दुसऱ्या डावात आजचा खेळ थांबला तेव्हा बांगलादेशाच्या २ बाद २६ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

लातूर जिल्ह्यातल्या उदगीर इथल्या पंचायत समितीच्या नव्या इमारतीचं तसंच तहसील आणि प्रशासकीय इमारतीचं उद्घाटन आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जनसन्मान यात्रेनिमित्त ते आज उदगीर इथं आले होते. यानिमित्त आयोजित मेळाव्याला पवार यांनी संबोधित केलं.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यातल्या आरमोरी तालुक्यात महिनाभर मुक्काम केल्यानंतर रानटी हत्तींचा कळप गडचिरोली शहराच्या सीमेवर दाखल झाला आहे. काल संध्याकाळी सेमाना देवस्थानाजवळचा रस्ता ओलांडून हत्तीच्या कळपाने मुडझा-पुलखल परिसरात प्रवेश केला.

<><><><><>

राज्यात येत्या दोन दिवसांत तुरळक ठिकाणी पाऊस पडेल. कोकण आणि मध्यमहाराष्ट्रात उद्या तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडेल असं भारतीय हवामानविभागानं कळवलं आहे.

//<><><><><><>//